सकाळ
सातारा, शनिवार,
२७ सप्टेंबर २०१४

# 'वसुंधरा'त आज ११ लघुपटांचे प्रदर्शन

## 'मुक्तसंवादा'त डॉ. प्रियदर्शनी कर्वे देणार पर्यावरण रक्षणासाठीच्या 'टिप्स'

सातारा, ता. २६ : पर्यावरण रक्षणासाठी आपल्या रोजच्या जीवनातील छोट्या कृतींमुळे मोठा परिणाम कसा साधता येईल याबाबतची उपयुक्त माहिती देणारा मुक्तसंवाद डॉ. प्रियदर्शनी कर्वे उद्या (शनिवारी) वसुंधरा चित्रपट महोत्सवाच्या निमित्ताने साधणार आहेत. महोत्सवात याबरोबरच उत्तम दर्जाच्या ११ लघुपटांचा आनंदही रसिकांना घेता येणार आहे.

शेतातील काडी कचऱ्यापासून बनवलेल्या 'कांडीकोळसा' इंधनावरील वाफेचा कुकर या तंत्रासाठी

पान २ वर

### आजचे प्रमुख लघुपट

- माय होम इज ग्रीन (३० मिनिटे) : कीटकनाशकांच्या माऱ्यापासून मुंगी आणि अळी स्वतःचा कसा बचाव करतात याची रंजक कहाणी.
- मिरॅकल वॉटर व्हिलेज : भूजल संवर्धनासाठी हिवरे बाजार ग्रामस्थांच्या प्रयत्नांची गाथा.
- शिवालिक मॉन्सून (२५ मिनिटे) : हिमालय आणि पठारी प्रदेशांच्या मधील शिवालिक पर्वतरांगेची ओळख.
- द लास्ट डान्स (१२ मिनिटे) : अस्वलांना पकडून रस्त्यावर नाचवले जाते. अशा बंधक अस्वलांबाबतचा लघुपट.
- रिड्यूस, रियूज, रिसायकल (एक तास ३८ मिनिटे) : कचऱ्याची किमान निर्मिती, जास्तीतजास्त पुनर्वापर आणि पूर्ण प्रक्रिया याविषयी माहिती.
- गंगेज- वॉटर लॅंड (५० मिनिटे) : भारत आणि बांगलादेश दरम्यानच्या त्रिभुज प्रदेशात दाट मनुष्यवस्ती आहे, तसेच अद्‌भुत वन्यजीवन बहरले आहे, याची माहिती.
- डू यू (एक मिनीट) : वृक्षारोपण आणि संवर्धन विषयक सामाजिक संदेश देणारा लघुपट.
- नाऊ यु (दीड मिनिटे) : वृक्षाविना मानवी जीवन धोक्यात असल्याचे सांगणारा लघुपट.
- इटस् नॉट चिल्ड्रेंस गेम (एक मिनीट) : कचरामुक्त शहरासाठीचा प्रयत्न.